# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## पूरग्रस्तांकरिता मदत रॅलीचे आयोजन

**दिनांक १४ ऑगस्ट, २०१९**

मागील काही दिवसात सांगली—कोल्हापूर परिसरात पुराने थैमान घातले. त्यामुळे जनजीवन विस्कळीतच नव्हे, तर धोकादायक बनले. ही परिस्थिती पाहता महाविद्यालयाच्यावतीने पूरग्रस्ताकरिता मदत निधी गोळा करून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय घडविला. याकरिता महाविद्यालयातून दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ रोजी रॅली काढण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांची चमू तयार करून प्रत्येक चमूकडे निधी गोळा करण्याकरिता एक बंद डब्बा देण्यात आला. याकरिता विद्यार्थ्यांनी गावातून रॅलीच्या माध्यमातून पूरग्रस्तांकरिता लोकांना मदतीचे आवाहन केले व लोकांकडून प्रतिसादही चांगला मिळाला. सर्वात जास्त निधी गोळा करणाऱ्या चमूचे प्राचार्य डॉ. केशवराव फाले यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तसेच प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशाच प्रकारे समाजहित जपण्याकरिता विद्यार्थीवर्गानी सदैव तत्पर राहले पाहिजे असे त्यांनी सांगितले. या रॅलीकरिता सर्व प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.




